(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# स्त्री सक्षमीकरणात महिला संघटनांचे योगदान : विशेष संदर्भ सातारा जिल्हा

Assit. Prof . Sakate Chhaya Bharat
Dept. of Political Science, Arts & Commerce College, Pusegaon, Dist, Satara, Maharashtr Email- sakatecb@gmail.com

**प्रस्तावना :**

सद्यस्थितीत स्त्रियांच्या जीवनामध्ये अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी स्त्री संघटना कार्यरत असणे ही आजच्या आधुनिक काळात गरजेचे आहे. या स्त्रीवादी संघटनांचा उदय स्त्रीवादी चळवळीतून झालेला आहे. प्राचीन काळापासून पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना समान दर्जा आणि संधी यापासून वंचीत ठेवण्यात आले होते. यातून स्त्रियांना मुक्त करण्यासाठी स्त्रीवादाचा उदय झाला. जेव्हा समता आणि सामाजिक न्याय यासारखी लोकशाही मूल्ये समाजात स्थिरावू लागल्यानंतर अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रियांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक स्थितीबद्दल विचार होवू लागला. यामध्ये मेरि वोलस्टनक्राफ्ट, जॉन स्टुअर्ट मिल, फ्रेंडरिक एंगेल्स, सिमॉन–द–बोव्हा आणि बेटी फ्रिडन इत्यादी विचारवंतांनी आपल्या विचारामध्ये स्त्रियांना राजकारण, शिक्षण, रोजगार, स्त्री चळवळी आणि स्त्री संघटना इत्यादी क्षेत्रामध्ये समानता मिळण्यासाठी प्रयत्न केले. स्त्रीवादाच्या विचारांबरोबरच स्त्री प्रश्नाच्या विविध बाजू पुढे मांडणाऱ्या असंख्य स्त्री संघटनाही मोठया प्रमाणात उदयास आल्या, यातून या स्त्री संघटना स्त्रीयांचे सक्षमीकरण करू लागल्या, त्यामध्ये अमेरिकेत 'नॅशनल ऑर्गनायझेशन ऑफ वुमेन' (१९६६), स्वीडनमध्ये 'ग्रुप–८' (१९७०), 'फ्रेडरिका ब्रिमेर असोशिऐशन' (१९९४), नार्वेमध्ये 'न्यू फेमिनीस्ट' (१९७०), डेन्मार्कमध्ये 'रेडस्टॉकींग ग्रुप' (१९७०), 'ॲलेक्झांड्रा ग्रुप' (१९७४–७६), 'ग्रुप– २७', (१९७०) आणि जर्मनीत ग्रीन पार्टी अशा अनेक स्त्रीवादी संघटना जागतिक पातळीवर स्त्री सक्षमीकरणासाठी कार्य करीत आहेत.

१९ व्या शतकात भारतामध्ये ब्रिटीश सत्ता जस जशी स्थिरावत होती तस तशी पश्चिमी उदारमतवादाची ओळख, नवशिक्षित भारतीयांना होऊ लागली. त्यामुळे स्त्रियांना दिलेले दुय्यम स्थान धर्माच्या व धार्मिक रूढीच्या नावाने स्त्रीयांचे होणारे आर्थिक, सामाजिक व लैंगिक शोषण इत्यादी विषयांना सार्वजनिक जीवनात वाचा फुटली. सतीची प्रथा, विधवा विवाह बंदी, केशवपन, कन्याविक्रय, बाल–जरठ विवाह यासारख्या स्त्रीयांवरील अन्यायी प्रथेविरूध्द राजाराम मोहन रॉय, ईश्वरचंद विद्यासागर, लोकहितवादी, महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, न्या. रानडे, गोपाळ गणेश आगरकर या १९व्या शतकातील समाजसुधारक आणि उदारमतवादी विचारवंतांनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे स्त्रीजीवनाशी संबंधित अशा अनेक प्रश्नासंबंधी सुधारणावादी कायदे होऊ लागले. फुले आणि आगरकरांनी प्रचलीत धर्म व समाज व्यवस्थेतून स्त्रियांची सुटका झाली पाहिले, पुरूषी वर्चस्वातून स्त्री मुक्त झाली पाहिजे, सार्वजनिक क्षेत्रा व्यतिरिक्त विवाहसंस्था व कुटुंब संस्थेच्या अंतर्गत स्त्रियांचे आर्थिक, शारिरीक, लैंगिक शोषण थांबले पाहिजे यासाठी प्रयत्न केले. त्याचबरोबर मुलींना शिक्षण मिळाले पाहिजे. यासाठी फुल्यांनी मुलींसाठी शाळा सुरू केली. ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री–पुरूष तुलना' हे पुस्तक लिहून भारतीय स्त्रीवादाला मोठे योगदान दिले. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्री शिक्षणाचा विचार करून अनेक शिक्षण संस्था, काम करणाऱ्या स्त्रियांसाठी वसतिगृहे स्थापन करून स्त्री चळवळीला चालना दिली. अशाप्रकारे भारतीय स्त्रीमुक्तीसाठी व सक्षमीकरणासाठी या समाजसुधारकांनी आणि उदारमतवादी विचारवंतांनी महत्त्वाचे योगदान दिले.

२० व्या शतकात जनआंदोलनामध्ये महात्मा गांधींनी मोठया प्रमाणात भारतीय स्त्रियांना सामील करून घेतले. तसेच भारतीय राज्यघटनेनी आरंभीच्या काळातच स्त्रीयांना पुरूषाप्रमाणे राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सास्कृंतिक हक्क प्रदान केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत क्रांतिकारी पाऊल उचलून स्त्रियांना न्याय देणारे 'हिंदू कोडबील' तयार

केले. १९७० च्या दशकाच्या मध्यभागी जी नागरी स्वातंत्र्य चळवळ उभी राहिली, यामध्येच भारतातील स्त्रियांच्या चळवळीचा उदय झालेला दिसून येतो. कारण भारतातील स्त्री चळवळीला खऱ्या अर्थाने स्त्रीवादी चळवळीचे परिमाण १९७५ नंतरच प्राप्त झाले. स्त्रीवादी चळवळीची व्याप्ती शहरापुरती मर्यादित असली तरी प्रसार माध्यमातून चळवळीची प्रतिमा खेडोपाडी पोहचली होती. १९७५ हे वर्षे संयुक्त राष्ट्र संघटनेनी 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून जाहीर केले. या निमित्ताने भारतीय स्त्रियांचा पाश्चात्य स्त्री मुक्तवादी चळवळीशी आणि विचारांशी संपर्क आला. १९७५ नंतर खऱ्या अर्थाने भारतात स्त्रीवादी चळवळ विस्तारली व फोफावली. १९८० च्या दशकात स्त्री चळवळीनी आणि संघटनानी स्त्री—पुरूष समतेचा संदेश लहान—मोठया गावांमध्ये अत्यंत हिरीरिने पोहचविला. अनेक कायद्यात बदल करून घेण्यातही स्त्री चळवळ आणि स्त्री संघटना यशस्वी झाल्या. १९७५ ते १९८५ या दशकात मेक्सिको, कोपन हेगन, नैरोबी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदांनी भारतीय स्त्री चळवळीला बळकटी दिली. यातून स्त्री संघटनांचे अनेक लहान—मोठे गट निर्माण झाले. १९९२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर स्त्रियांना संघटीत कार्यामुळे आरक्षण मिळाले. १९९५ नंतरच्या काळात शासनाच्या स्त्री सामर्थ्यशीलतेच्या योजनांचा भाग म्हणून स्त्रियांच्या स्वयंम साह्यता गटाचे जाळे उभे राहिले. आजच्या घडीला भारतातील स्त्री चळवळीत निर्वाचित स्त्री प्रतिनिधी, स्वायत्त स्त्री संघटना, राजकीय पक्षांच्या महिला आघाडया आणि एनजीओ कार्य करताना दिसून येतात.

सबलीकरण ही संकल्पना अत्यंत महत्वाची व आवश्यक आहे. महिलांचे सबलीकरण ही बहुआयामी व बहुमुखी वैशिष्टये असणारी प्रक्रिया आहे. सर्व पातळीवर महिलांचा विकास होण्याशी निगडीत अशी ही कल्पना आहे. अस्तित्वात असणाऱ्या भौतिक व मानवी संसाधनावर नियंत्रण ठेवणे त्यामध्ये वाटा मिळविणे हे महिला सबलीकरणामध्ये महत्वाचे सूत्र आहे. लोपेझ व झहिदी यांनी महिला सबलीकरण मोजमापासाठी खालील पाच महत्वाचे निर्देश सांगितले आहेत.

१. आर्थिक निर्देश— यामध्ये महिलांना काम करण्याची मिळणारी संधी आर्थिक स्थिती यांचा समावेश होतो.
२. शैक्षणिक निर्देश — शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण साक्षरता शिक्षण मिळण्याची संधी इत्यादी.
३. आरोग्य निर्देश — बाल जन्म मृत्यू दर स्त्रियांची प्रसुतीची सुरक्षा, स्त्रियांचे आरोग्य माता बाल संगोपन इत्यादी.
४. लोकसंख्या निर्देश — स्त्रियांचे लोकसंख्येमधील प्रमाण स्त्रिजन्म दर स्त्रियांवरील होणारे अत्याचार व हिंसा इत्यादी.
५. राजकीय निर्देश — महिलांचे मतदानाचे प्रमाण, निर्णय प्रक्रीयेतील महिलांचा सहभाग.

सबलीकरण म्हणजे राजकीय, सामाजिक, आर्थिक, आरोग्य, शैक्षणिक आणि सांस्कृतीक यांच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होणे. सर्वच पातळीवर महिलांचा विकास होणे ही एक महत्वाची बाब आहे. अस्तित्वात असणाऱ्या भौतिक व मानवी संसाधनांवर नियंत्रण ठेवणे, त्यामध्ये वाट मिळवणे हे महिला सबलीकरणातले महत्त्वाचे सूत्र आहे. यातून स्त्रीयांचा राजकीय सहभाग वाढला तरच त्यांना सार्वजनिक पातळीवरली निर्णय प्रक्रियेत सहभागी होता येईल व पर्यायाने त्यांचे सक्षमीकरण होईल. सक्षमीकरण म्हणजे स्त्रीयांचा निर्णय प्रक्रियेत सहभागी होणे. आधुनिक काळात प्रगत समाज म्हणजे ज्या समाजात मानवी संसाधनाचा ही प्रगती करण्यामध्ये समान संधी तसेच समान वाटा मिळतो अशा समाजाला प्रगत किंवा विकसित समाज म्हटल जाते. कोणत्याही समाजाच्या चिरंतन सामाजिक व आर्थिक विकासासाठी समाजातील सर्व घटकांचा समावेश असला पाहिजे. या दृष्टीने शाश्वत विकासाठी स्त्रियांना बरोबरीने विकास प्रक्रीयेमध्ये समावून घेतले पाहिजे. पंचायत राज व्यवस्थेत महिलांना सहभागाची समान संधी मिळाल्याने महिलांच्या राजकीय सबलीकरणाला गती मिळाली आहे. भारतीय लोकशाही

बळकट होण्यासाठी महिलांचे राजकीय सबलीकरण महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे समाजकारण, राजकारण, अर्थकारण, आरोग्य, शैक्षणिक आणि संस्कृतीकरण या सबलीकरणांच्या तत्त्वांचा समग्रपणे विचार करताना स्त्री अभ्यास या नव्याने विकसित झालेल्या ज्ञान शाखेला योगदान देण्याचे काम महिला संघटनांनी केले आहे. यासाठी समाजातील अनेक महिला संघटना स्त्री विषयाचे आत्मभान व राजकीय भान जागृत करण्याचे काम करीत असतात. त्यामुळे विविध देशातील सरकारांनी विविध आयोग नेमून आपापल्या देशातील स्त्रियांच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतला आहे. याचा परिणाम म्हणून शासकीय धोरणात काही अंशी बदल झाला व स्त्री सबलीकरणाचा अर्थ समाजात रूजायला लागला. हा अर्थ समाजात रूजवण्यासाठी गेली अनेक वर्षे महिला संघटना कार्यरत आहेत. सातारा जिल्हयात अनेक महिला संघटना असून स्त्री सक्षमीकरणाच्या संदर्भासाठी त्यातील प्रभाविपणे कार्य करणाऱ्या दोन संघटनांच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे.

राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील स्त्री प्रश्नांची मांडणी महिला संघटना कुठल्या पध्दतीने करतात हे महत्वाचे आहे. कारण आजही स्त्रीयांवर होणारा सर्व क्षेत्रातील हिंसाचार, अन्याय, आर्थिक दुर्बलता, स्त्रियांचे दुय्यम स्थान आणि सांस्कृतिक दृष्टया स्त्रियांवर घातलेली बंधने इत्यादी प्रश्न समाजात अस्तित्वात आहेत. भारतीय समाज व्यवस्था ही पुरूषप्रधान असून स्त्री—पुरूष समतेसाठी स्त्री चळवळ व महिला संघटना यांचे कार्य अभ्यासणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील विशेषत: पश्चिम महाराष्ट्र हा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय दृष्टया विकसित असलेला प्रदेश आहे. तरीही या प्रदेशात स्त्रीप्रश्न मात्र तसेच राहिले आहेत. त्यांचा चिकित्सक पध्दतीने सर्व अंगांनी अभ्यास होणे महत्त्वाचे आहे. म्हणून 'स्त्री सक्षमीकरणात महिला संघटनांचा योगदान : विशेष संदर्भ सातारा जिल्हा' हा प्रस्तुत संशोधनासाठी विषय निवडलेला आहे.

लोकशाही, समाजवादी आणि डाव्या विचारसरणीनुसार कार्यरत असणाऱ्या जिल्हयातील दोन महिला संघटना घेऊन प्रस्तुत संशोधनात अभ्यास करण्यात येणार आहे.

पूर्व साहित्याचा आढावा घेतला असता स्त्री प्रश्न, चळवळ कार्य यासंबधी लेखन झालेले आहे. तसेच महाराष्ट्रातील एकूण संघटनेसंबंधी लिखाण झालेले आहे. परंतु संशोधनात्मक अंगाने स्त्री सक्षमीकरणाच्या संदर्भात महिला संघटनाचा चिकित्सक अभ्यास झालेला नाही. हया संघटनांची स्त्री सक्षमीकरणाच्या संदर्भात संघटनात्मक चौकट व त्यांनी उभारलेल्या मागण्यांचा अभ्यास हया संशोधनातून केला जाणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

१. स्त्री सक्षमीकरणात सातारा जिल्हयातील महिला संघटनांच्या योगदानाचा अभ्यास करणे.
२. सातारा जिल्हयातील महिला संघटनांच्या कार्यामुळे महिलांच्या राजकीय आणि सामाजिक जाणिवेत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.
३. सातारा जिल्हयातील महिला संघटनांच्या कार्याची उपयुक्तता आणि मर्यादा अभ्यासणे.

**संशोधनाची गृहितके :**

१. सातारा जिल्हयातील महिला संघटनांच्या कार्यामुळे स्त्रीयांच्या सामाजिक आणि राजकीय जाणिवा निर्माण झालेल्या आहेत.
२. सातारा जिल्हयातील स्त्री विषयक प्रश्न सोडवण्यासाठी महिला संघटना उपयुक्त ठरलेल्या आहेत.
३. स्त्री सक्षमीकरणात सातारा जिल्हयातील महिला संघटनांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

सातारा जिल्हयातील 'महिला राजसत्ता आंदोलन' आणि 'महालक्ष्मी महिला मंडळ' या महिला संघटनांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात येणार आहे.

**महिला राजसत्ता आंदोलन (२०००):**

महिला आरक्षणामुळे गाव विकासाचे नेतृत्व करण्याची मिळालेली संधी आणि या संधीला जबाबदार नेतृत्वात रूपांतर करण्यासाठी योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षणाची जोड मिळाल्याने होणारे फायदे या अनुषंगाने २००० साली ही संघटना स्थापन झाली. या संघटनेचा विस्तार जवळ—जवळ महाराष्ट्र भर आहे. सातारा जिल्हयातील जावळी, सातारा आणि कोरेगाव या तीन तालुक्यांमध्ये या संस्थेचे काम चालते. महिलांना सर्व स्तरातील निर्णय प्रक्रियेत सहभाग मिळाला पाहिजे. नैसर्गिक आणि अन्य संसाधनांवर बरोबरीने हक्क मिळाला पाहिजे, उत्पादकतेचा दर्जा आणि समान लोककेंद्री धोरण राखले गेले पाहिजे. अंमलबजावणी, व्यवस्थापन, शिक्षणाच्या व विकासाच्या सर्व संधींची उपलब्धी या सर्व हेतूने संस्थेची स्थापना झाली आहे. या संघटनेचे भीम रासकर आणि अपर्णा महाजन संघटना राज्यप्रतिनिधी म्हणून तर नीलिमा कदम जिल्हा प्रतिनिधी म्हणून काम करीत आहेत. या महिला संघटनेची कार्यपध्दती ही गावातील प्रश्न गावात सोडवणे आणि गावातील महिलांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे संस्था सुरू करण्यामागचे मुख्य उद्‌देश आहेत. तालुका पातळीवर तालुका पंचायत महिला आघाडीची स्थापना करण्यात आली आहे. यामुळे तालुका पातळीवरील माहिती गावापर्यंत व गावातील समस्या आणि प्रश्न तालुका पातळीपर्यंत आणण्यासाठी हा अत्यंत उत्तम मार्ग आहे. तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा पंचायत महिला आघाडी हि महिलांना प्रशिक्षण, विविध कार्यशाळांचे आयोजन आणि शासकीय निर्णय गावापर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे काम केले जाते. ही संस्था महिला केंद्र धोरण सर्वात महत्त्वाचे मानते. धर्मनिरपेक्षता, लोकशाही मुल्यांच्या या विचारसरणीचा पुरस्कार करीत संघटना काम करत आहे. तसेच ग्रामसभा गौरव अभियान, ग्रामपंचायत दर्शन, अधिवेशन पूर्व कार्यशाळा, युवती प्रशिक्षण असे अनेक उपक्रम संस्था राबवित आहे. या संघटनेच्या माध्यमातून स्त्रीयांचे राजकीय सक्षमीकरण करण्यात येते. महिलांना मिळालेल्या राजकीय सहभागाच्या संधीला अधिक चांगल्या प्रकारे निभवण्यासाठी त्यांच्यात आत्मविश्वास, कैशल्य निर्माण करण्याचे काम ही संघटना करत आहे.

**'महालक्ष्मी महिला मंडळ' (१९९०):**

समाजातील निराधार महिलांसाठी आधार केंद्र स्थापन करून त्या ठिकाणी लघु व कुटिरोद्योग निर्माण करून महिलांना स्वावलंबी बनण्याची आणि स्वाभिमानाने जगण्याची संधी निर्माण करून देण्याच्या उद्देशाने १९९० साली ही संघटना स्थापन झाली. 'गाव तिथे अंगणवाडी तिथे महिला मंडळ' या शासकीय धोरणातून संघटनेने कामाला सुरूवात केली. ९ महिला संचालकांच्या मदतीने सौ. रत्नमाला शिवप्रसाद तावरे ह्या अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. या महिला संघटनेने मालमत्तेमध्ये महिलांना हक्क मिळणून देणे, कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविषयी जागृती करणे, कुटुंब संस्था टिकवण्यासाठी प्रयत्न करणे, दारूबंदी उपक्रम राबवणे, समुपदेशन व मदत केंद्र, स्त्री आरोग्य आणि पंचायत राज महिला शक्ती अभियान असे अनेक उपक्रम राबविले जातात. सर्व स्तरातील महिलांचे लोकशाहीच्या तत्वानुसार सक्षमीकरण करणे या विचारसरणीचा पुरस्कार करून ही संघटना गेली २८ वर्षे काम करीत आहे.

**निष्कर्ष**

१. स्त्री सक्षमीकरणात सातारा जिल्हयातील महिला संघटनांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.
२. सातारा जिल्हयातील महिला संघटनांच्या कार्यामुळे स्त्रीयांच्यात सामाजिक आणि राजकीय जाणिवा निर्माण झालेल्या आहेत.
३. सातारा जिल्हयातील स्त्री विषयक प्रश्न सोडवण्यासाठी महिला संघटना उपयुक्त ठरलेल्या आहेत.

४. सातारा जिल्हयातील महिला संघटनांच्या कार्यामुळे महिलांच्या राजकीय आणि सामाजिक जाणिवेत बदल झाला आहे.

**संदर्भ सूची:**

१. शिंदे ताराबाई, 'स्त्री–पुरूष तुलना', प्रतिमा प्रकाशन, पुणे, १ जून, १९९९.
२. फडके य. दि., 'महात्मा फुले समग्र वाड्.मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१.
३. चिपळूणकर विष्णुशास्त्री, 'निबंधमाला' खंड १ व २, वरदा, पुणे, १९९३.
४. गीताली मंदाकिनी, 'स्त्रीप्रश्न सोडवताना', दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००९.
५. भागवत विद्युत, 'स्त्रीप्रश्नाची वाटचाल', प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४.
६. मुळे अंजली, गीताली वि. म., 'स्त्री चळवळ आणि राजकारण समतेसाठी सत्ता संघर्ष', लोकवाड्.मय गृह, मुंबई, २००२.
७. गवाणकर रोहिणी, 'घडता घडविता – महिलांच्या सबलीकरणाकरीता लढणाऱ्या स्त्रियांची मनोगते', लोकवाड्.मयगृह, मुंबई.
८. दातार छाया, तांबे श्रुती, 'अस्तित्वसंघर्ष आणि सार्वभौमत्व – स्त्री अभ्यासासमोरील आव्हाने', महाराष्ट्र स्त्री अभ्यास व्यासपीठ, मुंबई, २००१.
९. कांबळे उत्तम, 'राजर्षी शाहू आणि महिला मुक्ती', सुगावा प्रकाशन, पुणे, २००३.
१०. जोगळेकर मृणालीनी, 'स्त्री अस्मितेचा आविष्कार', एकोणिसावे शतक भाग १ व २, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९९.
११. नरके हरी, 'महात्मा फुले साहित्य चळवळ', डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने', प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन, मुंबई, २००६
१२. पाटील शोभा, 'स्त्रियांची आत्मचरित्रे–स्त्रीवादी शोध', मल्हार प्रकाशन, पुणे, २००२.
१३. रानडे प्रतिभा, 'स्त्री प्रश्नांची चर्चा–एकोणिसावे शतक', पद्मगंधा, प्रकाशन, पुणे, २००५.
१४. सुमंत यशवंत,'स्त्रीवादाची ओळख', राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन, पुणेविद्यापीठ,पुणे,२०१२.
१५. पाटील भारती, 'स्त्रिया : समाज आणि राजकारण', हर्मिस प्रकाशन, पुणे, २०१४.
१६. पवार वैशाली, 'महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २०१२.
१७. Ahlawat Neerja, 'Women organizations and social networks', Rawat Publication, Jaipur, 1995.
१८. Raheem, Abdul A., 'Women Empowerment through Self-help Groups, New Century Publication, New Delhi, 2011.
१९. Desai Neera & Usha Thakkar, 'Women in Indian Society', National Book Trust, Delhi, 2004.
२०. Lopez-Claros August & Saadia Zahidi, 'Women's Empowerment : Measuring the Global Gender Gap', World Economic Forum, Switzerland, 2005.

**मासिके :**

१. महिला आंदोलन पत्रिका, मुंबई
२. बायजा, पुणे
३. समाज प्रबोधन पत्रिका, कोल्हापूर
४. प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी
५. मिळून साऱ्याजणी, पुणे

**Website :**

- http://narisamatamanch.org/
- http://www.streeaadharkendra.org/